आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचाराच्या तोफा थंडावल्या, बुधवारी होणाऱ्या मतदानासाठी यंत्रणा सज्ज

- आचारसंहिता लागू झाल्यापासून ८० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई, ६६० कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता जप्त

- महायुती आणि महाविकास आघाडीकडून विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळण्याचे दावे

**आणि**

- राज्यातले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे इतर राज्यात गेल्याचा राहुल गांधी यांचा आरोप, धारावीकरांना पुनर्विकासानंतर तिथंच घरं देण्याचं भाजपाचं आश्वासन

**<><><><><>**

विधानसभा निवडणूक आणि लोकसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी आज संध्याकाळी थांबली. राज्यात यंदा ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार २८८ आमदारांना निवडून देणार आहे. त्यांच्यासाठी १ लाख ४२७ मतदान केंद्रं उभारली असून दुर्गम भाग वगळता इतर ठिकाणी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ पर्यंत मतदान होईल. विधानसभा निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात असून नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी १९ उमेदवार पात्र ठरले आहेत.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यात सुमारे ८० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई झाली. ५६ हजारांहून अधिक शस्त्र जमा केली असून ६११ शस्त्र परवाने रद्द झाले आहेत. राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून ६६० कोटी रुपयांहून अधिक रकमेची मालमत्ता जप्त झाली आहे. त्यात १५३ कोटी रुपयांहून अधिक रोख, २८२ कोटी रुपयांहून अधिक रकमेचे मौल्यवान धातू यासह इतर गोष्टींचा समावेश आहे. सर्वाधिक २२९ कोटी रुपयाच्या मालमत्तेची जप्ती मुंबई उपनगर जिल्ह्यात झाली आहे.

**नाशिक** शहरातल्या एका हॉटेलमध्ये निवडणूक पथकाने छापा टाकून मोठ्या प्रमाणात रोकड पकडली. ही रक्कम कोट्यवधी रूपयांच्या घरात असून ती दोन जणांनी आणली असल्याची प्राथमिक माहिती आहे.

**<><><><><>**

राज्यात आता प्रचारसभा, मिरवणुका आयोजित करता येणार नाही. आयोजित केल्या तर आयोजक आणि सहभागी होणारे अशा दोघांवर गुन्हे दाखल होतील. यात दोन वर्षापर्यंत तुरुंगवास अथवा दंड अथवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या कालावधीत जाहिराती करतानाही नियमांचं पालन करण्याचे निर्देश आयोगानं उमेदवारांना आणि जाहिराती प्रसारण करणाऱ्यांना दिले आहेत.

**<><><><><>**

महाविकास आघाडीनं अनेक विकासकामांमध्ये अडथळे आणल्यामुळे लाखो रोजगारांवर गदा आली असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केला. मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. वाढवण बंदर, जैतापूर, बारसू रिफायनरी अशा अनेक प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. कोविड काळातही

महाविकास आघाडीने भ्रष्टाचार केल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. त्यामुळे महायुतीचं सरकार आणण्याचा निश्चय जनतेनं घेतला आहे, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

महायुती सरकारच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच नगरविकास खात्यात घोटाळा झाल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी आज केला. मुंबईत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. मुंबई शहरात मेट्रोचं काम अद्याप अपूर्ण आहे. मेट्रोमार्गासाठी बसवलेल्या खांबांवर अनेक ठिकाणी अद्याप गर्डर टाकणं बाकी असताना त्याचं रंगकाम करण्यात आलं आहे. यासाठी ७४ कोटी ४१ लाख रुपयांचा खर्च करण्यात आल्याचा आरोप ठाकरे यांनी यावेळी केला.

<><><><><>

जगात भारत पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. आता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन इतकी बनवायची असेल तर महायुतीला मतदान करावं, असं आवाहन केंद्रीय मंत्री जे. पी. नड्‌डा यांनी आज नवी मुंबईत केलं. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीचे वरिष्ठ नेतेही उपस्थित होते.

<><><><><>

महायुती सरकारच्या काळात शेतकरी, कामगार, तरुण, महिला यांचं जगणं कठीण झालं आहे, महागाई आणि बेरोजगारी प्रचंड वाढली आहे, अशी टीका करत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाविकास आघाडीला विजयी करण्याचं आवाहन केलं. ते वसई इथं प्रचारसभेत बोलत होते. भाजपा समाजामध्ये फूट

पाडण्याचं काम करत असून काँग्रेस जोडण्याचं काम करत आहे, असं खर्गे म्हणाले. भाजपा आणि महायुतीने भ्रष्टाचार करून लुटले आहे, महाविकास आघाडी मात्र दिलेली आश्वासनं सत्ता आल्यावर पूर्ण करेल असं खर्गे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

संविधान बदलणं हा भाजपाचा हेतू असून, संविधानाला धक्का लागला तर नागरिकांचे मूलभूत अधिकार धोक्यात येतील, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते आज बारामती इथं विधानसभा निवडणूक प्रचाराच्या सांगता सभेत बोलत होते. आपल्या सत्ताकाळात आपण कारखाने, एमआयडीसी उभारून हजारो रोजगार निर्माण केले. मात्र महायुती सरकारच्या काळात राज्यात येऊ घातलेले उद्योग गुजरातला नेण्यात आले असा आरोप पवार यांनी केला. महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

महायुतीला जनतेचा कौल असल्यानं युतीच्या १६५ पेक्षा जास्त जागा निवडून येतील आणि सरकार आपलंच येईल, असा विश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. नागपूरात ते वार्ताहरांशी बोलत होते.

**होल्ड - बाईट -बावनकुळे**

काँग्रेसने लोकसभेत खोटा प्रचार केला असून त्यावर जनतेचा विश्वास उरला नाही, त्यामुळे हरियाणात झालं तसंच महाराष्ट्रात होईल, असा दावा त्यांनी केला.

**<><><><><>**

राज्यातलं महायुती सरकार असंविधानिक आणि भ्रष्टाचारी असून महायुतीला सत्तेवरुन खाली खेचणं हे पहिलं उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केलं आहे. ते आज संगमनेर इथं वार्ताहर परिषदेत बोलत

होते. राज्यात सर्वत्र महायुती सरकार बद्दल प्रचंड राग असून, या निवडणुकीत १८० जागा जिंकून महाविकास आघाडी सत्ता स्थापन करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

राज्यातल्या ५ लाख युवांना रोजगार देण्याची क्षमता असलेले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे महाराष्ट्रातून गुजरातला गेल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत रोजगार, महागाई, महिलांचे प्रश्न यासह महाराष्ट्राची संपत्ती महाराष्ट्राच्या जनतेला मिळणं हेच महत्त्वाचे मुद्दे आहेत, असं सांगून त्यांनी महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यातल्या आश्वासनांचा पुनरुच्चार केला. धारावीचा पुनर्विकास स्थानिकांचं हित लक्षात घेऊन केला जाईल. हा मुद्दा त्यापेक्षा व्यापक आहे, खारफुटीचं जंगल, मुंबईत येणारा पूर यावरही उपाय करणं गरजेचं असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.

**होल्ड बाईट- राहुल गांधी**

**<><><><>**

धारावीचा पुनर्विकास झाल्यानंतर तिथल्या सर्व रहिवाशांना धारावीतच घर देण्यात येईल, असं भाजपा नेते विनोद तावडे यांनी सांगितलं. धारावीतल्या लोकांना विस्थापित करण्यात येणार आहे, या काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या आरोपांना उत्तर देताना ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. धारावीची जमीन अदानी समूहाला दिली जाणार नाही, ती राज्य शासनाच्याच ताब्यात राहील, असं तावडे यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

राज्यात किमान तापमान सरासरीच्या आसपास होतं. येत्या दोन दिवसांत राज्यातलं तापमान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**